महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https:// dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/एआयसीटीई/अंतिम मान्यता /२०२४-२५/ ४९४ दिनांक : 5 SEP 2024

कार्यालयीन आदेश :

विषय : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यमान संस्थेत विनाअनुदानित तत्वावर नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करणे व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमता वाढीसाठी तसेच वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) अधिसंख्य जागांची तुकडी सुरु करण्यास मान्यतेबाबत...

संदर्भ : १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: ७८८७९३-HTED-१४०२५/११/२०२४-MHT (TE-५), दिनांक : ९.०७.२०२४.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: ८०४२६६-HTED-१४०२५/११/२०२४-MHT (TE-५), दिनांक : ११.७.२०२४

३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: ८०५९४४-HTED-१४०२५/११/२०२४-MHT (TE-५), दिनांक :२२.७.२०२४

४. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: ७९८९९१-HTED-१४०२५/०९/२०२४-MHT (TE-५), दिनांक : ९.७.२०२४

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर परिषदेच्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सोबतच्या “विवरणपत्र अ” मध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास मान्यता दिली आहे. तसेच विद्यमान संस्थेत विनाअनुदानित तत्वावर वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) अधिसंख्य जागांची तुकडी सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार सोबतच्या “विवरणपत्र अ” मधील संस्थांनी संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेबाबतची कागदपत्रे या संचालनालयास उपलब्ध करुन दिली आहेत. संबंधित संस्थांनी शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये, संयुक्त खात्यात १० वर्ष मुदतीची मुदतठेव व निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क इ. बाबतची कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संलग्नता प्रदान केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भीन शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सोबतच्या “विवरणपत्र अ” मध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर विद्यमान संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास व विद्यमान संस्थेत विनाअनुदानित तत्वावर वर्किंग प्रोफेशनल्स (कार्यरत व्यावसायिक) अधिसंख्य जागांची तुकडी सुरु करण्यास तसेच अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. शुल्क नियामक प्राधिकरणाने/ फी निश्चिती समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर अनिवार्य बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी संस्थेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करतील. तसेच संचालनालयाने निर्देशित केलेली माहिती संस्थांना संचालनालयामार्फत विकसीत केलेल्या प्रवेश क्षमता मान्यतेच्या पोर्टलवर अद्ययावत करणे अनिवार्य राहील.

३. संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासन, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व या संचालनालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, यांना राहतील.

५. शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये ज्या बाबींसाठी दुस-या वर्षासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव विहित केलेली आहे, अशा बाबींसाठी संबंधित संस्थांनी दुसरे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापुर्वी संस्थेचे अध्यक्ष / सचिव व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संयुक्त नांवे १० वर्षासाठीची मुदतठेवीची पावती पडताळणीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील.

६. ज्या सस्थांच्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संलग्नता अटी व शर्तीच्या अधिन राहून प्रदान केली असल्यास संलग्नतेच्या आदेशातील अटी व शर्तींची पुर्तता संबंधित संस्थांना करणे बंधनकारक राहील. तसेच संबंधित संस्थांना मंडळाच्या नियमांप्रमाणे नियमित संलग्नता घेणे बंधनकारक राहील.

७. आग प्रतिबंधक प्रमाणपत्राचे सक्षम प्राधिकाऱ्यांकडून वेळोवेळी नुतनीकरण करणे अनिवार्य राहील.

८. विद्यार्थी, विद्यार्थीनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी/ कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरीता शिखर परिषद/ शासन/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती तसेच या व्यतिरीक्त वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे विवरणपत्र “अ” मधील संस्थांना बंधनकारक राहील.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर/ मुंबई/नागपूर/ नाशिक/पुणे.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर/मुंबई/नागपूर/पुणे.
४. संबंधित संस्था (संबंधित विभागीय कार्यालयामार्फत)
५. कायांसन क्र.३ आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्ती.

क्र.१०/एनजीपी/एआयसीटीई/अंतिम मान्यता/२०२४-२५/८९४, दि. ०५ /०९/२०२४सोबतचे सहपत्र

विवरणपत्र अ

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व शासन मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यमान संस्थेत विनाअनुदानित तत्वावर नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करणेसाठी मान्यतेबाबत

(विभाग निहाय)

| अ.क्र. | डीटीई संकेतांक | शैक्षणिक संस्थेचे नांव | शैक्षणिक संस्थेचा पत्ता | संस्थेचा प्रकार | विभाग | जिल्हा | शासन मान्यतेचा शासन निर्णय व दिनांक | पदविका अभ्यासक्रमाचे नांव | अभ्यासक्रम प्रकार | प्रवेशक्षमता २०२३-२४ | प्रवेशक्षमता २०२४-२५ | विद्यापीठ / मंडळ | मान्यतेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर विभाग | | | | | | | | | | | | | |
| १ | २११२ | श्रीयश प्रतिष्ठानचे, श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी | गट नं. २५८, सातारा तांडा, छत्रपती संभाजीनगर-४३१००५ | विना-अनुदानित | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: ७८८७९३-HTED-१४०२५/११/२०२४-MHT (TE-५), दिनांक : ९.७.२०२४ | आर्टीफिशियल इंटेलिजेन्स (एआय) अँड मशिन लर्निंग | विना-अनुदानित | ६० | १२० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | प्रवेशक्षमता वाढीसह मुदतवाढ (EoA & Increase in intake) |
| २ | २१२९ | एम. एस. बिडवे इंजिनिअरींग कॉलेज | पो.बॉ. नं. ११२, वसवाडी, बार्शी रोड, लातूर-४१३५३१ | विना-अनुदानित | छत्रपती संभाजीनगर | लातूर | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: ७९८९९१-HTED-१४०२५/११/२०२४-MHT (TE-५), दिनांक : ९.७.२०२४ | सिव्हील इंजिनिअरिंग | विना-अनुदानित | ० | ३० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | नवीन अभ्यासक्रम सुरु करणे |
| | | | | | | | | कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरींग | विना-अनुदानित | ० | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | नवीन अभ्यासक्रम सुरु करणे |
| | | | | | | | | इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | विना-अनुदानित | ० | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | नवीन अभ्यासक्रम सुरु करणे |
| | | | | | | | | इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलि-कम्युनिकेशन इंजिनिअरींग | विना-अनुदानित | ० | ३० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | नवीन अभ्यासक्रम सुरु करणे |
| | | | | | | | | इन्फॉर्मेशन टेक्नॉलाजी | विना-अनुदानित | ० | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | नवीन अभ्यासक्रम सुरु करणे |
| | | | | | | | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | विना-अनुदानित | ० | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | नवीन अभ्यासक्रम सुरु करणे |
| ३ | २१८१ | कै. पुज्य त्रिंबकाप्पा बसवंताप्पा गिरवलकर पॉलिटेक्नीक | यशवंतराव चव्हाण चौक, अंबाजोगाई | विना-अनुदानित | छत्रपती संभाजीनगर | बीड | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: ८०४२६६-HTED-१४०२५/११/२०२४-MHT (TE-५), दिनांक : ११.७.२०२४ | सिव्हील इंजिनिअरिंग | विना-अनुदानित | ० | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | नवीन अभ्यासक्रम सुरु करणे |
| | | | | | | | | इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींग | विना-अनुदानित | ० | ६० | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई | नवीन अभ्यासक्रम सुरु करणे |

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई